# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/०१/२०२५ (मंगळवार) सायंकाळ**

---

## २४ तासाच्या आत चोरीचा घरफोडीचा गुन्हा उघड, ८३,००० रूपयाचा मुददेमाल जप्त
## रामटेक पोलीसांची कारवाई

दिनांक २०/०१/२०२४ रोजी फिर्यादी सौ. रंजना कवडुजी ढोरे, वय ५० वर्ष रा. महात्मा फुले वार्ड रामटेक यांनी तक्रार दिली की त्यांच्या घराचा मागचा दरवाजा उघडा असल्याचा फायदा घेवुन घरामधुन लोखंडी आलामरीतुन अज्ञात आरोपी याने १) प्रत्येकी ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले दोन जोड किमंती १२,००० रू. २) प्रत्येकी पाउने तेरा ग्रॅम वजनाचे सोन्याचे २ गोप मिंती ५१,००० ३) प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या बदामी सोन्याच्या दोन अंगठया किमंती २०,००० रू. असा एकुन ८३,००० रूपयाचे दागीने कोणीतरी अज्ञात ईसमाने चोरून नेल्याने पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३०५(अ)भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला.

अवघ्या २४ तासात रामटेक पोलीसांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक पध्दतीने तपास करीत प्रविण भानुदास कोलते वय ४३ वर्षे रा.तालसवाडा ता.मलकापुर जि.बुलढाणा याला अटक केली तसेच आरोच्या ताब्यातुन १) प्रत्येकी ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातले दोन जोड किमंती १२,००० रू. २) प्रत्येकी पाउने तेरा ग्रॅम वजनाचे सोन्याचे २ गोप मिंती ५१,००० ३) प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाच्या बदामी सोन्याच्या दोन अंगठया किमंती २०,००० रू. असा एकुन ८३,००० रूपयाचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पोस्टे सावनेरः–** दिनांक २०/०१/२०२५ चे १९.५७ वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितेश हिरामनजी खडसे वय ३१ वर्षे रा. वार्ड क्र. ०४ महालक्ष्मी नगर, सावनेर हा त्याचे बिरला ओपस पेन्ट कंपनीमध्ये काम करणारा शुभम देवलकर याचे बोलविणेवरून यश बार, सावनेर येथे गेला व तिथे ते कंपनीचे कामाबाबत १५ ते २० मिनीटे बोलले. नंतर फिर्यादीला त्याचे वडीलाचा फोन आल्याने फिर्यादी घरी जाण्यासाठी बारचे बाहेर आला असता यातील **आरोपी जगदिश उर्फ जग्गू शंकर बनकर** याने बारचे बाहेर येवून **आरोपी प्रविण प्रेमलालजी सेवके वय २९ वर्षे रा. वार्ड क्र. ०७ सुभाष प्राथमिक शाळेजवळ, सावनेर** याला हात वर करून इशारा केला, तेव्हा आरोपी प्रविण प्रेमलालजी सेवके हा हातात तलवार घेवून व आरोपी प्रविण प्रेमलालजी सेवके याचे सोबत असणारा आरोपी रीतेश रविंद्र गोंडुळे यातील फिर्यादीला जिवानीशी मारण्यासाठी रोड क्रॉस करून येतांना दिसले असता फिर्यादीने तलवारीचा वार चुकवला म्हणून तलवार मो.सा चे मागे लागली व फिर्यादी घाबरून घटनास्थळावरून मो.सा. ने पळून गेला. नंतर फिर्यादी आरोपी प्रविण सेवके, जगदिश बनकर व रीतेश राजेंद्र गोंडुळे यांचे विरोधात तलवारीने जिवानिशी मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपी प्रविण प्रेमलालजी सेवके वय २९ वर्षे रा. वार्ड क्र. ०७ सुभाष प्राथमिक शाळेजवळ, सावनेर व रीतेश रविंद्र गोंडुळे, वय २४ वर्ष वार्ड क्र. ३ तेलगाव यांना अटक करण्यात आली आहे.

## पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीतील

## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारूची विक्री करणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

पोस्टे जलालखेडा:— दि. २०/०१/२०२५ रोजी पोस्टे जलालखेडा येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलिंग करित असतांना विश्वसनीय मुखबिरद्वारे खात्रीशिर माहीती मिळाली कि, मौजा करंजोली शेत शिवारात असलेल्या भाऊसाहेब पवार यांचे शेतात असलेल्या कोठ्यात राहणारी महिला आरोपी हि अवैध्यरित्या दारु विक्री करित आहे. अश्या मिळालेल्या माहीती वरुन स्टॉफ यांनी मौजा करंजोली शेत शिवारातील ती राहत असलेल्या झोपडीची पाहणी केली असता पांढऱ्या रंगाच्या शेंदऱ्या रंगाचे बुच असलेल्या २० लिटर क्षमतेच्या प्लास्टीक डबकी मध्ये १५ लिटर गावठी मोहाफुल दारु असा एकुण कि. ७५०/— रु. चा मुद्देमाल मिळुन आल्याने नष्ट करण्यात आला.

तसेच पोस्टे जलालखेडा हद्दीतील पोलीस उमठा परिसरात मोहाफुल गावठी दारू विक्रीसाठी बाळगणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु बाळगणारा **आरोपी नामे— सोनु विकास पवार, वय ३६ वर्ष, रा. उमठा ता. नरखेड** हा मोहाफुल दारू बाळगताना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून ४० लिटर क्षमतेच्या दोन कॅन मध्ये एकुण ६० लिटर मोहाफुल गावठी दारु प्रत्येकी १०० रुपये प्रमाणे असा एकुण ६००० रु. चा मुद्देमाल मिळून आला. दोन्ही आरोपीतांविरुद्ध कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर